केंद्र पुरस्कृत योजनांबाबत केंद्र शासनाने वितरित केलेला निधी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा झाल्याची खात्री करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**
**शासन परिपत्रक क्रं.संकीर्ण १०१८/प्र.क्र.४६/अर्थोपाय,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०५ डिसेंबर, २०२३.

**वाचा:-** (१) शासन परिपत्रक,वित्त विभाग, क्रमांक अर्थसं-२०२०/प्र.क्र.६४/अर्थ-३, दि.१६.०४.२०२०
(२) शासन परिपत्रक,वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण १०१८/क्र.४६/अर्थोपाय दि.१८.०५.२०२०

**परिपत्रक**

केंद्र पुरस्कृत योजना संदर्भात केंद्र शासनाकडून प्राप्त निधी एकत्रित निधीमध्ये प्राप्त झाल्याबाबत विभागनिहाय नोंद घेण्यात आलेला तक्ता वित्त विभागाच्या अर्थोपाय कार्यासनाकडून सर्व संबंधित विभागांच्या अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांच्या ई-मेलवर दर शुक्रवारी पाठविण्यात येतो. केंद्र शासनाच्या योजनांबाबतचा निधी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा झाल्याबाबतचा ई-मेल प्राप्त झाल्यानंतर त्या त्या योजनांशी संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांनी सदर योजनांसाठी प्राप्त झालेल्या निधी बाबतचे केंद्र शासनाचे आदेश पडताळून खात्री करून घ्यावी आणि यासाठी नस्ती वित्त विभागाच्या अर्थोपाय कार्यासनाकडे वेगळ्याने संदर्भित करावयाची आवश्यकता नाही अशा सूचना संदर्भीय दिनांक १८ मे २०२० च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

२. राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना, २०२३-२४ मधील भाग ८ मध्ये, जर राज्याने ९५ टक्के पेक्षा जास्त केंद्र पुरस्कृत योजनांचा केंद्र व राज्य हिश्श्याचा निधी केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ च्या आदेशान्वये विहित केलेल्या मुदतीमध्ये(३० दिवसांमध्ये )संबंधित SNA ला वितरित केला, तर राज्याला रुपये १०० कोटी इतका प्रोत्साहन निधी मंजूर करण्यात येईल आणि त्या निधीमधून राज्य शासन कोणत्याही भांडवली गुंतवणुकीच्या योजना राबवू शकेल अशी तरतूद करण्यात आली आहे. केंद्र पुरस्कृत योजनांच्या निधी वितरणाच्या प्रक्रियेच्या अनुषंगाने प्रशासनाच्या अर्थ मंत्रालयाने दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनानुसार दि.१ एप्रिल २०२३ नंतर केंद्र पुरस्कृत योजना अंतर्गत केंद्र हिस्सा वितरित झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत राज्य शासन केंद्र हिश्श्याची रक्कम व समतोल राज्य हिस्सा SNA खात्यात वर्ग करेल, तीस दिवसानंतर होणाऱ्या विलंबाच्या दिवसाकरिता ७ टक्के वार्षिक दराने दंडनीय व्याजाची आकारणी केंद्र शासनाकडून करण्यात येणार आहे. दंडनीय व्याजाची रक्कम केंद्र शासनाच्या एकत्रित निधीमध्ये जमा करावी लागणार आहे.

३. वित्त विभागाकडून प्रत्येक आठवडयात विभागास केंद्र शासनाचा निधी प्राप्त झाल्याबाबत कळवून देखील अनेक विभागांकडून विहित मुदतीत केंद्र हिश्श्याची रक्कम व समतोल राज्य हिस्सा SNA खात्यात वर्ग करण्यात येत नसल्याचे दिसून येत आहे. वरील परिस्थितीत केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी विहित मुदतीत वितरीत करणे शक्य व्हावे, ज्या योगे राज्य शासनावर व्याजाचा भुर्दंड पडणार नाही तसेच राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी सहाय्य योजना २०२३ -२४ अंतर्गत विशेष प्रोत्साहन

निधी शासनास मिळण्यासाठी वित्त विभागातील अर्थोपाय कार्यासनाकडून केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये प्राप्त झाल्याबाबत ई-मेल दर शुक्रवार ऐवजी **प्रत्येक कार्यालयीन दिवशी सकाळी ११:३० वाजता सर्व विभागांच्या अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव यांच्या ई-मेलवर पाठवण्यात येईल.**

४. संबंधित विभागाच्या अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांनी वित्त विभागाच्या अर्थोपाय कार्यासनाकडून प्रत्येक कार्यालयीन दिवशी प्राप्त होणारे ई-मेल योजना हाताळणाऱ्या संबंधित कार्यासनास तात्काळ पोहोचवण्यासाठी त्यांच्या कार्यालयात एका जबाबदार अधिका-याची नियुक्ती करावी. त्यानुसार संबंधित विभागप्रमुख यांनी केंद्र शासनाचे निधी वितरणाचे आदेश पडताळून केंद्र शासनाने वितरित केलेला निधी राज्यांच्या एकत्रित निधीमध्ये जमा झाल्याची खात्री करुन घ्यावी. त्यानुसार संबंधित केंद्र पुरस्कृत योजना अंतर्गत केंद्र हिस्सा वितरित झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत केंद्र हिश्श्याची रक्कम व समतोल राज्य हिस्सा SNA खात्यात वर्ग करण्याबाबतची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची राहील. कोणत्याही परिस्थीतीत विहीत मुदतीत केंद्र हिश्श्याची रक्कम व समतोल राज्य हिस्सा SNA खात्यात वर्ग करण्यात येईल आणि राज्य शासनास व्याजाचा भुर्दंड पडणार नाही याबाबत संबंधित विभागाच्या सचिवांनी लक्ष घालावे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सकेतांक २०२३१२०५१८२५४१६६०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH UMESHRAO GAIKWAD

Digitally signed by SANTOSH UMESHRAO GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=1d60828c41033ab1da6d64ef17879745d578b334c05c1e8151ef933f134060bc, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BC8833F9E213A7E4DFB9D2B071C9202EA52A04054E53B0C1BBF9E50C90A2CF5C, cn=SANTOSH UMESHRAO GAIKWAD
Date: 2023.12.05 18:25:32 +05'30'

**( संतोष गायकवाड )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय,मुंबई.
२) सर्व सह सचिव/ उप सचिव (अर्थसंकल्प शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय,मुंबई.
३) निवड नस्ती, अर्थोपाय कार्यासन, वित्त विभाग.